अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १२९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ ।

# मोहिते-पाटलांचा अंतिम वार! VS राम सातपुतेंचा आखरी फैसला!



✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक लक्षवेधी निवडणुका या माळशिरस तालुक्यात होतं आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरश्चंद्र पवार गट विरुद्ध भारतीय जनता पक्ष असे या निवडणुकीचे वरवरचे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात ही जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक माजी आमदार राम सातपुते यांच्यासाठी 'आखरी फैसला' तर मोहिते पाटील परिवारासाठी अंतिम वार ठरणार आहे. माळशिरस तालुका म्हणजे मोहिते-पाटलांचा बालेकिल्ला हे उभ्या महाराष्ट्रला माहित. मागच्या काही वर्षांपर्यंत मोहिते-पाटील आणि त्यांचे विरोधक असा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा इथं बाज राहिलेला. पण परिवर्तनाच्या झंझावाती राजकारणात अलिकडं इथल्या निवडणुकांना वेगळे धुमारे फुटलेत जे केवळ अकलूज, माळशिरस, सोलापूर जिल्ह्यानेच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्रानं पाहिलेलं. मोहिते-पाटलांचा गढ असलेल्या या तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक प्रचंड वेगळ्या वळणावर गेली. अकलूज (माळशिरस) चा गढ काबुत घेण्यासाठी भाजपनं लावलेली बलाढ्य ताकद अन् दुसऱ्या बाजूला मोहिते-पाटलांनी आपलं निर्वीवाद वर्चस्व कायम राखण्यासाठी सुरु ठेवलेली निकाराची झुंज यामध्ये या तालुक्यातील राजकारण निवडणुकीच्या निमित्तानं स्फोटक झालंय.**

माजी आमदार राम सातपुते यांचा 'आखरी फैसला' तर मोहिते-पाटील घराण्याचा 'अंतिम वार' असंच या निवडणुकांमधील चित्र दिसतंय. मोहिते-पाटील आणि राम सातपुते यांच्यासाठी माळशिरस तालुक्यातील सध्याची 'लोकल बॉडी'ची निवडणूक भविष्यात खासदारकी आणि आमदारकीसाठी सर्वस्वपणाला लावणारी होतेय. आमदारकीच्या निवडणुकीत राम सातपुतेंना चितपट करुन त्यांचा या तालुक्यातील नेतृत्वाचा चौफेर उधणारा अश्व मोहिते-पाटलांनी रोखला. सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीतदेखील सातपुतेंच्या पाडावासाठी 'शिवरत्न' नं आपलं नेतृत्वपणाला लावलं आहे.

दुसऱ्या बाजूला अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीत मोहिते-पाटलांच्या गढाला सुरुंग लावण्यासाठी भाजपनं माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आमदार राम सातपुते यांच्या हाती निवडणुकीची शस्त्रं देत इथल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत मोठी ताकद लावलेली दिसते. राम सातपुते आणि मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाच्या विजयाचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्तानं, केवळ हा फैसला ठरत नाही तर सन २०२९ मधील आमदारकीच्या निवडणुकीची मोर्चेबांधणी मानली जात आहे . त्यातूनच राम सातपुते आणि मोहिते-पाटील; विधानसभेचा हा गड सुरक्षित करण्याच्या पार्श्वभूमीवर, जंग जंग पछाडत असल्याचं या तालुक्यातील निवडणुकांमध्ये फेरफटका मारल्यानंतर दिसतं. महत्त्वाची बाब म्हणजे सध्या आरक्षित असलेला माळशिरस विधानसभेचा मतदार संघ २०२९ मध्ये 'सर्वसाधारण' होण्याची शक्यता आहे.

मोहिते-पाटलांच्या पाडावासाठी इर्षे ला पेटलेल्या सातपुतेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांची साथ घेत अकलूज नगरपरिषदेला दहा हजार मतं घेतली.मोहिते-पाटलांच्या बालेकिल्यात चार नगरसेवक निवडून आणले. ही बाब त्यांच्यादृष्टीने पर्यायानं भाजपसाठी मोठी सकारात्मक मानली जात असली तरी माळशिरस तालुक्यातील त्यांचं नेतृत्व अबाधित राहण्यासाठी इथलं जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक त्यांच्यासाठी आता 'अंतिम फैसला' ठरणार आहे.

## भाजप अन् मोहिते-पाटलांच्या लढाईत

## मशाल अन् हाताचं काय?

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

माळशिरस तालुक्यातील भाजप विरुद्ध मोहिते-पाटील अशी धूमदबाके लढाई लागली असतानाच महाविकास आघाडीतील काँग्रेस मात्र चार गटांमध्ये स्वबळावर नशीब आजमावत आहे. उद्धवसेनेनेही एका जागेवर उमेदवार दिला आहे. भाजपला रोखताना सुफडासाफ पॅटर्नचा फॉर्म्युला या निवडणुकांमध्ये राबवताना काँग्रेस आणि उद्धवसेनेचे काय होणार? असा सवाल उपस्थित केला जातोय.

## अनेक ठिकाणी दुरंगी- तिरंगी लढती

संग्रामनगर, वेळापूर जिल्हा परिषद गटात दुरंगी, मांडवे व फोंडशिरस येथे तिरंगी, पिलीव, निमगाव, दहिगाव व माळीनगर येथे चौरंगी तर बोरगाव जिल्हा परिषद गटात पंचरंगी लढत होत आहे. संग्रामनगर, वेळापूर, मांडवे येथे तिरंगी लढत होत आहे. पंचायत समितीची निवडणूक पाहता दुरंगी लढत बोरगाव, मांडवे, भांबुर्डी, फोंडशिरस, संग्रामनगर येथे तर तिरंगी लढत गुरसाळे, दहिगाव, कण्हेर, मेडद, माळीनगर, लवंग, जांबूड, यशवंतनगर, पिलीव, तांदूळवाडी येथे होत आहे सर्वात जास्त वेळापूर गणात ६ उमेदवार रिंगणात आहेत. येथे बहुरंगी लढत आहे.

## जिल्हा परिषद गटांमधील 'या' लढती चर्चेत



जिल्हा परिषदेसाठी दहिगाव गटात भाजपकडून संस्कृती सातपुते तर शरद पवार राष्ट्रवादीकडून जीवन जानकर, मांडवेमधून भाजपतर्फे धर्मराज माने तर शरद पवार राष्ट्रवादीकडून गौतम माने, फोंडशिरस गटातून शरद पवार राष्ट्रवादीकडून अर्जुनसिंह मोहिते-पाटील तर भाजपच्यावतीनं हरिदास वाघमोडे आखाड्यात आहेत. माळीनगर गटातून काँग्रेसकडून किशोरराजे गाडे तर भाजपच्या उमेदवार नागेश तुपसौंदर्य आहेत. बोरगावमधून शरद पवार राष्ट्रवादीकडून नागनाथ भोसले तर भाजपनं संजय साठे यांना निवडणुकीत उतरवलं आहे. वेळापुरात शरद पवार राष्ट्रवादीकडून मिनाक्षी सरतापे, भाजपकडून प्रेरण खंडागळे यांच्यामध्ये सामना होतोय. निमगावमधून भाजपकडून ज्योती ठोंबरे तर शिंदेसेनेकडून निलावती ठवरे या उमेदवार आहेत. पिलीव गटातून रणजितसिंह जाधव हे शरद पवार राष्ट्रवादीकडून तर चंद्रकांत जाधव भाजपचे उमेदवार आहेत. त्यांच्यामध्ये फाईट होतेय.

## 'हम है यहाँ के सिंह और राजे...'



माळशिरस तालुक्याच्या राजकारणामध्ये भाजपचा कोणताही हस्तक्षेप मोहिते-पाटील यांना नको आहे. स्वत:च्या बालेकिल्ल्यात 'हम है यहाँ के सिंह और राजे...' हे चित्र कायम राहण्यासाठी मोहिते-पाटलांनी भाजपला वेशीवर रोखण्याचा चंग बांधलेला दिसतो. कोणत्याही परिस्थिती माळशिरस तालुक्यातील जि.प. आणि प.स.चे गड आपल्या नेतृत्वाखाली आणण्यासाठी त्यांनी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदेसेनेला सोबत घेतलं आहे. या दोन्ही पक्षांना एक-एक गट देऊन सात गटांत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या चिन्हावर उमेदवार रिंगणात उतरवले आहेत.

## माजी अध्यक्ष फत्तेसिंह यांच्या सूनबाई राजेश्वरी आखाड्यात

माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा विजयसिंह मोहिते-पाटील यांचे मावस बंधू फत्तेसिंह माने-पाटील हे सध्या भाजपमध्ये आहेत. संग्रामनगर पंचायत समिती गणातून त्यांच्या सूनबाई राजेश्वरी कृष्णराज माने-पाटील या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्याशिवाय माजी उपाध्यक्ष सूर्यकांत माने-देशमुख यांचे चिरंजीव अमृतराज माने-देशमुख हे वेळापूर गणातून रिंगणात आहेत. विद्यमान आमदार उत्तम जानकर यांच्या सौभाग्यवती विमल जानकर यादेखील वेळापूरमधून निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## खा.धैर्यशिलभैय्या आणि धवलदादा एका व्यासपीठावर





यंदाच्या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट म्हणजे एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील आणि डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील हे एकाच व्यासपीठावर आल्याचे दिसून आले. दोन्ही राष्ट्रवादी मिळून या निवडणुका लढत असल्यानं हा चमत्कार दिसला आहे. डॉ.धैर्यशील मोहिते-पाटील परिवारानं अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीत अजित पवार राष्ट्रवादी गटात प्रवेश केला होता. तालुक्यातील राष्ट्रवादीसह सर्व उमेदवाराच्या प्रचाराचा शुभांरभाप्रसंगी कित्येक वर्षांनी डॉ. धवलसिंह हे 'शिवरत्न' बंगल्यावर गेल्याचे दिसून आल्याचे सांगण्यात आले.

## महाविकास आघाडीत काँग्रेसमुळे बिघाडी

जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर भाजपने ग्रामीण भागातील आणखी काही नेते पक्षात घेतले. त्यामुळे भाजपला ९ जिल्हा परिषद गटांत उमेदवार मिळाले. याविरोधात सर्वपक्षीय आघाडी करण्याचा प्रयत्न खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याकडून झाला आहे. मात्र काँग्रेसने माळीनगर, बोरगाव, निमगाव, पिलीव या गटांत आणि तांदुळवाडी, पिलीव, वेळापूर गणांत स्वतंत्र उमेदवार दिले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे समोर आले आहे. सध्या माळशिरस तालुक्यात खरी लढत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (शरद पवार) अशीच होत आहे.

## 'दहिगाव' गटात सातपुते अन् जानकरांच्या नेतृत्वाच्या परीक्षेत कोण ठरणार बाजीगर?

दहिगाव जिल्हा परिषदेच्या गटातील निवडणुकीकडे केवळ माळशिसच नव्हे, तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे. विधानसभा आखाड्यानंतर राम सातपुते आणि उत्तम जानकर हे तगडे नेते पुन्हा एकदा आमने-सामने आले आहेत. या गटातून भाजपकडून राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती तर व त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून आमदार उत्तम जानकर यांचे चिरंजीव जीवन हे निवडणूक लढवत आहेत.इथल्या निवडणुकीत विजयाचा बाजीगर कोण ठरणार? हे बघणं अत्यंत महत्त्वाचं आहे.

## मोहिते-पाटील अन् जानकरांच्या एकत्रित ताकदीचा सोमवारी दिसणार 'करिष्मा'

माळशिरस तालुक्यात सर्वाधिक ९ जिल्हा परिषद गट व १८ पंचायत समिती गण आहेत. या निवडणुकांसाठी मोहिते-पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांनी एकत्रित ताकद लावली आहे. त्याचा परिणाम कितपत उमटणार? हे येत्या सोमवारी निवडणुकीच्या निकालातून दिसून येईल.

## जयाभाऊ अन् धैर्यशीलभैय्यामधील संघर्ष टोकाला

माळशिरस तालुक्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी नगरपरिषदेप्रमाणे जि.प. निवडणुकीतही लक्ष घातले आहे. त्यातून खा. मोहिते-पाटील आणि त्यांच्यात कलगीतुरा झाला. पालकमंत्र्यांच्या सभा माळशिरस तालुक्यात आवर्जून घेतल्या गेल्या. येथे आमदार उत्तम जानकर आणि राम सातपुते यांच्याप्रमाणेच पालकमंत्री गोरे आणि खा. मोहिते-पाटील यांच्यातला संघर्षही टोकाला गेला.

## वैष्णवीदेवी मोहिते-पाटील निवडणुकीच्या रिंगणात!

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील यांचे चिरंजीव अर्जुनसिंह यांच्याकडे जिल्हा परिषदेचा कारभार देण्याचा विचार मोहिते-पाटील परिवाराचा असावा. त्यामुळे त्यांना दोन ठिकाणी निवडणुकीच्या आखाड्यात उतरवण्यात आले आहे. फोंडशिरस जिल्हा परिषद गट व दहिगाव जिल्हा परिषद गटातील गुरसाळे गणातून ते रिंगणात आहेत. त्याशिवाय त्यांच्या पत्नी वैष्णवीदेवी मोहिते- पाटील या यशवंतनगर पंचायत समिती गणातून निवडणूक लढवत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हा मोबाईल आता डोक्यात चाललाय !

कल्याण
147-20-145

मुंबई
466-67-359

# मुलतानीया बेकरीचे मालक सुनील सदारंगानी यांची आत्महत्या

## पनाश अपार्टमेंटवरून उडी टाकून संपावले जीवन : व्यावसायिक क्षेत्रात शोककळा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

शहरातील खाद्यव्यवसाय क्षेत्रात परिचित असलेले मुलतानी बेकरींचे मालक तथा उद्योजक सुनील मोतीलाल सदारंगानी (वय ६०, मूळ रा. सोलापूर, सध्या पुणे) यांनी गुरुवारी दुपारी विजापूर रोड परिसरातील पनाश अपार्टमेंटवरील १७ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. या घटनेमुळे सोलापुरातील व्यापारी क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे.

होटगी रोडवरील मुलतानी बेकरी हे नाव ब्रेड, बिस्किटे तसेच इतर बेकरी पदार्थांसाठी अनेक वर्षांपासून प्रसिद्ध आहे. सुनील यांचे वडील मोतीलाल सदारंगानी आणि त्यानंतर सुनील यांनी सदारंगानी यांनी हा व्यवसाय उभा केला होता. त्यामुळे शहरात त्यांची ओळख एक यशस्वी उद्योजक म्हणून होती. काही वर्षांपूर्वी त्यांनी सोलापुरातील मालमत्ता विकून पुण्यात वास्तव्यास जाण्याचा निर्णय घेतला होता. मिळालेल्या माहितीनुसार, ते काही काळापासून वैयक्तिक कारणांमुळे अस्वस्थ होते आणि त्यांच्यावर उपचारही सुरू होते. तीन-चार दिवसांपूर्वी ते सोलापुरात नातेवाईकांकडे आले होते. गुरूवारी ते विजापूर रोडवरील पनाश अपार्टमेंटमध्ये गेले. नंतर ते १७ व्या मजल्यावर गेले. तिथे त्यांनी सूर्याला नमस्कार करत खाली उडी मारल्याचे सांगण्यात येते. खाली पडल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.



सुनील मोतीलाल सदारंगानी

घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या प्रकरणाची नोंद विजापूर नाका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

सुनील सदारंगानी हे सोलापुरातील प्रसिद्ध उद्योजक मोतीलाल सदारंगानी यांचे चिरंजीव तसेच उद्योगपती राजकुमार राठी यांचे जावई होत. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शहरातील व्यावसायिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता राठी बंगल्यातून निघणार आहे.